

# रियासतकार

श. श्री. पुराणिक

ચી. શ્રી. વિ. પુરાણિક

ચી. અ. સૌ. રમાબાઈ
પુરાણિક

વાંચે ચરણી.

લખી. પુરાણિક
૨૯-૮-૦૨

મે આ ફેરના તે.ગ્રેટ
નાહીક.
ને એ રસ્તુ ભ.૫ રમા
એ વડકો જવ:
લખવરિ
એ વ પુરિ.

# रियासतकार

( गोविंद सखाराम सरदेसाई )

श. श्री. पुराणिक

चंद्रकला प्रकाशन

**चंद्रकला प्रकाशन : १५१**

**प्रकाशिका**
सौ. शशिकला उपाध्ये
१३८, कसबा पेठ,
पुणे - ४११ ०११.

© श. श्री. पुराणिक

**प्रथमावृत्ती**
मार्च २००२

**मुखपृष्ठ**
चंद्रमोहन कुलकर्णी

**मुखपृष्ठ व आतील छपाई**
जंगम कलामुद्रण, २५/१०, नांदेड फाटा,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.

**अक्षरजुळणी**
पॅम आर्टस् अँण्ड प्रिंट
सौ. पद्मिनी रुईकर
१३९५, कसबा पेठ, पुणे ४११ ०११.

**मूल्य रु. ३५०/-**

या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी साहित्य संस्कृती मंडळाचे अंशतः अनुदान लाभले आहे.

ज्यांच्या सक्रिय सहकार्याशिवाय
हा ग्रंथ सिद्धीस जाऊच शकला नसता
त्या श्री. स. मा. गर्गे व
प्रा. म. अ. कुलकर्णी
यांस

# साभार ऋणनिर्देश

१) मासिकांतील व नियतकालिकांतील लेख, गो.स. सरदेसाई (१९१८-५९) - ध्रुव, चित्रमयजगत्, मनोरंजन, लोकप्रभा, अभिरुची, किर्लोस्कर, स्त्री, सह्याद्रि, आरोग्यमंदिर, मनोहर, सकाळ, स्वराज्य.
२) सरदेसाई वार्षिक दैनंदिन्या, (१९३८-१९५८) (अप्रकाशित)
३) माझी संसारयात्रा - गो. स. सरदेसाई (१९५६) प्रकाशक - के. भि. ढवळे, चिरा बाजार, मुंबई - २.
४) श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात, गो. स. सरदेसाई (१९५६) प्रकाशक - द. श्री. गानू / एस्. जगन्नाथ आणि कंपनी, ५२८ नारायण पेठ, पुणे - २.
५) श्यामकांतची पत्रे, गो. स. सरदेसाई (१९३४) प्रकाशक - श्री. रा. टिकेकर, टिळक रोड, पुणे - २.
६) सरदेसाई स्मारक ग्रंथ, (१९३८) प्रकाशक - श्री. रा. टिकेकर, सरदेसाई स्मारक समिती, मुंबई.
७) जदुनाथ सरकार व रियासतकार सरदेसाई, (१९६१) - श्री. रा. टिकेकर, प्रकाशक - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
८) रियासती, गो. स. सरदेसाई.
९) Main Currents in the Maratha History, गो. स. सरदेसाई (१९२६), प्रकाशक - पाटणा विद्यापीठ, पाटणा.
१०) Jadunath Sarkar Commemoration Volume I (Ed. Dr.H.R. Gupta) (1958) - Punjab University, Hoshiarpur, Punjab.
११) शेजवलकर : निवडक लेखसंग्रह (१९७७), प्रकाशक - ह.वि.मोटे, ह.वि.मोटे प्रकाशन, दादर, मुंबई - १४.

# प्रस्तावना

## सरदेसायांचे पहिले दर्शन

त्या प्रसंगाला आज बरोबर अठ्ठेचाळीस वर्षे झाली. आमच्या लोणावळयाच्या व्ही. पी. एस्. हायस्कूलमध्ये २६ जानेवारी १९५२ रोजी भारतीय प्रजासत्ताकाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी म्हणून रियासतकार सरदेसायांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यात आले. त्यावेळी माझे शालेय शिक्षण संपले होते व मी कॉलेजात जाऊ लागलो होतो; पण मी सरदेसायांच्या रियासती वाचल्या होत्या म्हणून आदराने व कुतूहलाने त्या कार्यक्रमाला शाळेत गेलो. आमच्या शं. दा. जोशी सरांनी सरदेसायांचा परिचय करून दिला. त्यांच्या भाषणातले 'नानासाहेबांनी आज साठ वर्षे मराठ्यांचा इतिहास लिहिला आहे' हे त्यांचा मोठेपणा मनावर बिंबवणारे मार्मिक विधान आजही माझ्या मनात घोळत आहे. नंतर सरदेसाई भाषण करण्यास उठले. मी उत्सुकतेने ऐकू लागलो, परंतु माझी निराशा झाली. सरदेसायांना वक्तृत्वाचे अंग नव्हते असे दिसून आले. त्यांना आवाज नव्हता. भाषणात विस्कळितपणा फार होता. त्यांचे वयही त्यावेळेला पंचाऐशी वर्षांचे झाले होते, तेही कदाचित् एक कारण असू शकेल. बोलताना ते हातातले कागद पाहून मधूनमधून वाचून दाखवत होते. काहीही असो - आज एका मोठ्या माणसाचे उत्कृष्ट भाषण ऐकायला मिळेल या आशेने मी गेलो होतो त्या माझ्या आशेची निराशा झाली, हे मात्र खरे. भाषणानंतर थोड्या वेळाने सरदेसाई आणि आमचे शिक्षक कामशेतची लोकल पकडायची म्हणून स्टेशनवर चालत गेले. एक तर स्टेशन शाळेपासून अगदी जवळ होते व त्याकाळी आजच्यासारखा रिक्षा किंवा मोटारींचा प्रघात नव्हता. लोक साधे होते. त्यामुळे लहान असोत की मोठी असोत, आपल्या पायांवर उभी असलेली माणसे सगळीकडे चालत येत व चालत जात. त्याप्रमाणे सरदेसायांसारखा मोठा माणूसही स्टेशनवरून चालत शाळेत आला

व शाळेतून चालतच स्टेशनवर गेला. त्यावेळी तारुण्यसुलभ कुतूहलाने मी जणू त्यांचा पाठलाग केल्यासारखा, त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून त्यांच्या मागे चालत गेलो. त्यावेळी सरदेसायांच्या व्यक्तिमत्त्वाचा जो ठसा माझ्या मनावर उमटला तो अजून कायम आहे. सरदेसाई गोरेपान होते. चेहरा नुकतेच स्नान केल्यासारखा टवटवीत दिसे. डोळे बारीक, पंचाऐंशी वर्षांचे वय झाले असूनही चालणे अत्यंत जलद. जणू शेलारमामाच. उंची पाच फुटांवर थोडी. शरीर सडपातळ. अनावश्यक औंसभर मांस म्हणून अंगावर नाही. नाक अत्यंत तीक्ष्ण व अणकुचीदार. पांढरी पँट, पांढरा शर्ट, काळा कोट, डोक्यावर लहानशी लांब बडोदेशाही काळी पगडी. हुबेहूब एखाद्या पारशासारखे दिसत. या अशा मला निरतिशय आदर वाटणाऱ्या थोर पुरुषाचे चरित्र माझ्या हातून लिहिले जाण्याचा योग माझ्या कुंडलीत असल्याचे भविष्य त्यावेळी जर कोणी केले असते तर मी स्वत:च त्याला वेड्यात काढले असते; पण आज जवळ जवळ पन्नास वर्षांनी तो योग आला आहे खरा!

## चरित्र अद्याप झाले नाही

सरदेसायांना जाऊन बेचाळीस वर्षे झाली. वस्तुत: एवढ्या प्रदीर्घ काळात त्यांचे साधार व विस्तृत चरित्र प्रसिद्ध होण्यास काही हरकत नव्हती. काय असेल ते असो, पण त्यांचे एकही विस्तृत तर राहोच पण संक्षिप्त सुद्धा चरित्र प्रसिद्ध झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे खरी. ही गोष्ट केवळ सरदेसायांच्याच बाबतीत घडली आहे असे नव्हे. गेल्या शंभर वर्षांत इतिहासाच्या क्षेत्रात आपल्याकडे रावबहादूर ग. चिं. वाड, वासुदेवशास्त्री खरे, का. ना. साने, राजवाडे, पोतदार, ग. ह. खरे, शेजवलकर, य. न. केळकर, पुरंदरेमास्तर, शं. ना. जोशी, पिसुर्लेकर, पारसनीस, सेतुमाधवराव पगडी, वा. सी. बेंद्रे, न. र. फाटक असे इतिहासाचे एकापेक्षा एक नामांकित अभ्यासक होऊन गेले; पण खरेशास्त्री व राजवाडे यांचा अपवाद सोडला, तर बाकी इतर कुणाचेही चरित्र असे उपलब्ध नाही. असे का असावे, हे खरोखर कळत नाही. इतिहास हा मुळातच रक्तपाताचा, लढायांचा रौद्र, गंभीर आणि उग्र विषय. त्यात पुन्हा राजवाडे, खरे, शेजवलकर, पोतदार हे इतिहास संशोधक ब्रह्मचारी, त्यामुळे ब्रह्मचाऱ्यांच्या व त्यातही इतिहासाला वाहून घेतलेल्या उग्रप्रकृती ब्रह्मचाऱ्यांच्या चरित्रांत संसारीजनांना रस वाटण्यासारखे काय असणार अशीही शंका चरित्रकाराला येणे शक्य आहे. तसे असेल तर तो मोठा प्रमाद समजावा लागेल. ब्रह्मचाऱ्यालाही भावना असतात व इतिहासकारही माणूसच असतो; आणि त्याचे चरित्र कमालीचे हृदयंगम होणे शक्य आहे, हे इतिहासकारांचा

मुकुटमणी असलेल्या गिबनच्या व मेकॉलेच्या चरित्रावरून प्रचीतीस येण्यासारखे आहे. गिबनचे आत्मचरित्र तर फारच सुंदर आहे; आणि कॉटर मॉरिसनने चरित्र सुरेख लिहिले आहे. तीच गोष्ट मेकॉलेचा भाचा ट्रॅव्हेलियन याने लिहिलेल्या मेकॉलेच्या चरित्राबद्दल. गिबन आणि मेकॉले हे दोघेही अगदी बालब्रह्मचारी होते. आता इतिहास संशोधक संसारी असला तर त्याचे चरित्र जास्तच चित्तवेधक होण्याची शक्यता आहे. कारण प्रपंचाच्या चिंता, मुलाबाळांची काळजी, पैशाची ओढाताण, बायकोच्या कटकटी आणि या भरीला कवडीचीही प्राप्ती करून न देणारा इतिहास संशोधनासारखा आतबट्ट्याचा व्यापार करण्याचे घेतलेले वेड - या संघर्षामुळे तुकारामाप्रमाणे त्या संशोधकाचा ध्येयवाद कसा कसाला लागत असेल व त्याच्या संसारात हर्षविषादांची केवढी वादळे उठत असतील हे पाहावयाचे असेल तर फ्राउडने लिहिलेले कार्लाईलचे व त्याच्या बायकोचे चरित्र पाहावे.

आपल्याकडे या दृष्टीने खरेशास्त्री, पिसुर्लेकर, सरदेसाई, डॉ. केतकर या प्रापंचिक इतिहास संशोधकांची चरित्रे मुद्दाम अभ्यास करण्यासारखी आहेत. या संशोधकांच्या सुगृहिणींनी त्यांच्या ओढघस्तीच्या संसारात त्यांना इतिहासाच्या कामात केलेली मदत पाहिली म्हणजे ज्ञानकोशकार केतकरांच्या पत्नी शीलवतीबाईंप्रमाणे या साऱ्या 'शीलवतीं'ची तुलना सीता, सावित्री, दमयंती यांच्याशीच करावी लागेल; मुद्दा हा की इतिहास संशोधक ब्रह्मचारी असो की संसारी असो, त्याचे चरित्र लिहिण्यास त्यामुळे कसलीही बाधा येत नाही. त्या दृष्टीने सरदेसायांचे चरित्र गेल्या चाळीस वर्षात लिहिले जाण्यास हरकत नव्हती. परंतु, महाराष्ट्राबाहेर व महाराष्ट्रातही सरदेसाई यांचे ऋणानुबंधी व अभ्यासक मोठ्या संख्येने असताना त्यांचे चरित्र लिहिले गेले नाही हे मात्र खरे. या विधानाला एकच ठळक अपवाद आहे ज्याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे; तो म्हणजे श्री. रा. टिकेकर यांचा 'सरकार व सरदेसाई' हा ग्रंथ. यातही श्लेष असा आहे की, टिकेकरांचा प्रस्तुत ग्रंथ म्हणजे सरकार व सरदेसाई या दोन समानशील इतिहास पंडितांचा तौलनिक अभ्यास आहे. ते काही सरदेसायांचे असे चरित्र नाही. टिकेकर हे सरदेसाई यांचे अन्तेवासी होते. ते त्यांचे चरित्र लिहिणारही होते; पण ते काम त्यांच्यासारख्या अधिकारी पुरुषाकडूनही सिद्धीस गेले नाही. अशाप्रकारे सरदेसायांच्या चरित्राच्या बाबतीत सर्वत्र शून्याकार असताना ते चरित्र लिहिण्याचे काम माझ्याकडे यावे, हा नियतीचा योगायोगच म्हटला पाहिजे. तसे असेल तर मी तो दैवाचा मोठाच अनुग्रह समजतो.

## फार जुनी ओळख

सरदेसायांच्या ग्रंथांची व माझी ओळख फार लहानपणी म्हणजे मी शाळेत असतानाच झाली. याचे सर्व श्रेय माझ्या वंदनीय तीर्थरूपांना दिले पाहिजे. ते लोणावळ्याच्या रेल्वे इन्स्टिट्यूटचे सभासद होते. त्यांना वाचनाची आवड होती व त्यांचा हा पैतृक वारसा त्यांनी मला दिला. 'When you have brought a child to love a book, you have done a great thing for him!' असे जॉनसनने म्हटले आहे. माझ्या वडिलांनी मला ग्रंथांची व ग्रंथालयांची गोडी लावली आणि माझ्या आयुष्याचे कल्याण केले. रेल्वेच्या त्या ग्रंथालयात त्याकाळी नामांकित इंग्रजी व मराठी ग्रंथांचा फार मोठा संग्रह होता. सरदेसायांच्या 'रियासती', चिंतामणराव वैद्यांचे 'मध्ययुगीन भारत', नाथमाधव, हडप, हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या या ग्रंथालयात मी वाचल्या. इतकी वर्षे झाली; पण काळाच्या धुक्यातून, तो लोणावळ्याचा मुसळधार पाऊस, ते झोंबणारे गार वारे, ग्रंथांनी भरलेली ती अंधारलेल्या ग्रंथालयातील काचेची कपाटे, ती चाळणारा मी, आणि पलीकडच्या खोलीत बसलेले ग्रंथपाल आर. एल. पिंगळे हे सारे दृश्य प्रत्यक्ष पाहात असल्यासारखे मन:श्चक्षूंना आजही दिसते. सरदेसायांच्या ग्रंथांतून उसन्या घेतलेल्या विद्वत्तेचे प्रदर्शन मी शाळेतल्या परीक्षेच्या पेपरात मुक्तहस्ताने करीत असे व आमचे इतिहासाचे शिक्षक, भाऊराव पाठक माझ्या त्या 'बालपांडित्या'चे मुक्तकंठाने कौतुक करीत आणि 'या विद्यार्थ्याइतके इतिहासाचे ज्ञान मलाही नाही' असे भर वर्गात प्रांजळपणाने सांगत. त्यांनी मला गो. कृ. मोडकांचे 'मुलांचा महाराष्ट्र' हे पुस्तक वाचण्यास दिले. अशा प्रकारे सरदेसायांच्या आणि माझ्या परिचयाचा पाया शालेय वयातच घातला गेला, हे सांगण्यासाठीच शिष्टसंमत नसलेल्या व म्हणून अनिच्छेने सांगितलेल्या या 'किंचित्' आत्मचरित्राचा उल्लेख.

पुढे मी कॉलेजात नोकरीला लागल्यानंतर सरदेसायांच्या साऱ्या रियासती व पेशवे दप्तर विकतच घेतले. मे महिन्यात पुण्यास आल्यावर केसरी - मराठा ग्रंथालय, गोखले हॉल, किर्लोस्कर कंपनीचे ग्रंथालय यांत बसून सरदेसायांबद्दलचा ठिकठिकाणी आलेला मजकूर मी उतरून घेत असे. माझ्याशी परिचय नसताना सुद्धा हे सर्व ग्रंथपाल अत्यंत सौजन्याने वागले हे मुद्दाम सांगितले पाहिजे. एकच उदाहरण देतो. किर्लोस्कर कंपनी म्हणजे काही कॉलेज नव्हे. गोविंदराव टेंबे थट्टेने किर्लोस्कर कंपनीला लोखंडाचा कारखाना व 'किर्लोस्कर' मासिकाला लोखंडी मासिक म्हणत असत; पण त्या लोखंडी माणसांची रसिकता इतकी

अभिजात होती की त्यांनी कॉलेजलाही लाजवील असे समृद्ध ग्रंथालय सजविले होते. तेथे मी एकदा सरदेसायांनी १९४३ च्या एप्रिलात 'स्त्री' मध्ये लिहिलेला 'पुण्यशील साध्वी' हा लेख मागितला. ते ग्रंथपाल इतके तत्पर होते की त्यांनी तो लेख असलेला अंक तर काढून दिलाच पण वर तो लेख उतरून घेण्यासाठी कागद व पेन्सिलही दिली. असे ग्रंथपाल व अशी ग्रंथालये आहेत म्हणून पुणे हे विद्येचे माहेरघर झाले आहे; आणि पुण्यातील ग्रंथालये ही 'ज्ञानाची सदावर्ते' आहेत.

## कथा : ग्रंथसिद्धीची व ग्रंथप्रसिद्धीची

सरदेसायांच्या माझ्या अभ्यासाला मूर्त स्वरूप येण्याचा योग 'काळ' चे संपादक मामाराव दाते यांच्या कृपेने आला. त्यांनी 'रियासतकार सरदेसाई' हा माझा प्रदीर्घ लेख १९८४ च्या नोव्हेंबरात 'काळ' चा दिवाळी अंक म्हणून छापला. ही चोवीस पृष्ठांची पुस्तिका होती. तिच्यावर ना. सं. इनामदार, य. न. केळकर व सरदेसायांचे पुतणे डॉ. अरविंद सरदेसाई यांचे चांगले अभिप्राय आले. ही पुस्तिका फारशी खपली नाही. मामांना तर तो आतबट्ट्याचाच व्यवहार झाला असावा. मला मात्र तो व्यवहार त्यात आर्थिक प्राप्ती काही झाली नसली तरी, फारच फायद्यात पडला. कारण त्या पुस्तिकेमुळे माझी श्री. स. मा. गर्गे यांच्याशी ओळख झाली. त्या ओळखीमध्ये आजच्या या मोठ्या चरित्राचे बीज आहे.

१९८८ मध्ये मी बाजीराव चरित्र लिहीत असताना माझी मॉडर्न कॉलेजातील प्रा. म. अ. कुलकर्णी यांच्याशी ओळख झाली. त्यांनी बाजीरावाचे चरित्र तर मला दिलेच, पण मी त्यांना भेट दिलेले 'रियासतकार सरदेसाई' हे पुस्तक श्री. स. मा. गर्गे यांना वाचण्यास दिले. गर्गे त्यावेळी रियासतींच्या नव्या आवृत्ती काढीत होते. त्यांना माझे पुस्तक बरेच आवडले व त्यांनी मला सरदेसायांचे विस्तृत चरित्र लिहिण्यास सुचवले व त्यासाठी आपल्याजवळचे सर्व साहित्य अभ्यासासाठी देण्याची तयारी दाखवली.

गर्ग्यांच्या पत्राप्रमाणे मी प्रा. कुलकर्णी यांच्याबरोबर त्यांना भेटलो. त्यांनी आपल्या जवळचे सरदेसायांबद्दलचे सर्व साहित्य मला दिले. ते साहित्य फार अवाढव्य होते. १९१८ पासून १९५९ पर्यंत मनोरंजन, चित्रमयजगत्, अभिरुचि, लोकप्रभा, किर्लोस्कर, सह्याद्रि, धनुर्धारी, इत्यादी नियतकालिकांतील सरदेसायांच्या व सरदेसायांबद्दलच्या लेखांची ती चाळीस वर्षांची दुर्मिळ कात्रणे होती; सरदेसाई स्मारक ग्रंथ होता व सर्वांत विशेष म्हणजे १९३८ ते १९५३ या पंधरा वर्षांतल्या

सरदेसायांच्या Xerox केलेल्या इंग्रजीतील दैनंदिन्या होत्या. त्या साहित्याच्या जोडीला रियासतींचे खंड, 'माझी संसारयात्रा' हे आत्मचरित्र, 'श्यामकान्तची पत्रे', शेजवलकर, द. वि. आपटे इत्यादींचे लेख होते. या साहित्याचा यथाशक्ती अभ्यास करून मी 'रियासतकार' या नावाने सरदेसायांचे चरित्र लिहिण्यास १५ ऑक्टोबर १९९३ रोजी प्रारंभ केला व ७ सप्टेंबर १९९४ रोजी ते पुरे केले. एक वर्ष लागले व ८५० हस्तलिखित पाने झाली.

ग्रंथ लिहून तर झाला. आता त्याच्या प्रसिद्धीचा यक्षप्रश्न पुढे उभा राहिला. पॉप्युलर प्रकाशनाचे रामदास भटकळ सरदेसायांच्या रियासतींच्या नव्या आवृत्त्या प्रसिद्ध करीत होते, त्यामुळे सरदेसायांचे चरित्रही ते प्रसिद्ध करतील म्हणून मी भोळेपणाने भटकळांना विचारून पाहिले. त्यांनी तत्परतेने सभ्य शब्दांत पण स्वच्छपणे नकार कळविला. त्यानंतर दोनतीन वर्षे सरदेसायांच्या चरित्राचे हे बासनात मोठ्या तरतुदीने बांधून ठेवलेले बाड माझ्याकडे माळ्यावर लोळत पडले होते. त्याच्या प्रसिद्धीचा आज जो योग येत आहे तो पाहिला म्हणजे योगायोगांच्या साखळीचा चमत्कार वाटल्याशिवाय राहात नाही. नागपूरचे माझे मित्र प्रभाकर चाफेकर हे पु. भा. भाव्यांचे स्नेही व परमभक्त होते. त्यांना मी लिहिलेले पु. भा. भावे यांचे चरित्र प्रसिद्ध व्हावे असे फार वाटत होते. या चरित्रासाठी साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळावे म्हणून चाफेकरांनी मला प्रा. राम शेवाळकर यांना भेटण्याचा सल्ला दिला. त्यावेळी मी त्यांच्यापाशी सरदेसाई चरित्राची गोष्ट काढली. शेवाळकरांनी त्या ग्रंथासाठी अनुदान मिळावे म्हणून साहित्य संस्कृती मंडळाकडे अर्ज करण्यास सांगितले. यथावकाश माझा अर्ज मंडळाच्या बैठकीपुढे आला. त्यावेळी प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अनुदान मिळण्याबद्दल जोरदार समर्थन केले. सुदैवाने प्रसिद्ध साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार त्यावेळी अध्यक्ष होते. मी त्यांना पत्र लिहिले होते व म. श्री. दीक्षितांनीही त्यांना या ग्रंथाचे महत्त्व वेळोवेळी सांगितले होते. मिरासदारांनी या चरित्राला चौदा हजार रुपयांचे अनुदान देण्याचा ठराव केला. पुण्याच्या 'चंद्रकला प्रकाशना'च्या सौ. शशिकला उपाध्ये यांनी हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याची जबाबदारी घेतली. अशा प्रकारे आज सरदेसायांचे हे जे चरित्र प्रसिद्ध होत आहे, त्याचे सारे श्रेय वर उल्लेखिलेल्या सज्जनांचे व सुजनांचे आहे. माझे श्रेय असे त्यात फार थोडे आहे.

### व्यक्तिदर्शन हे मूळ सूत्र

या चरित्राच्या रचनेबद्दल आणि पद्धतीबद्दल दोन शब्द सांगणे आवश्यक

आहे. 'रियासतकार' हे या ग्रंथाचे नाव असले व रियासतींबद्दल त्यात विवेचन असले तरी 'रियासती' हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय नसून 'रियासतकार' हा आहे. माणूस म्हणून सरदेसाई कसे होते हे मूळ सूत्र धरून त्यांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा इतिहास या ग्रंथात सांगितला आहे. माणूस हा झाडासारखा असतो. झाडाचे बी पडते, त्याचे रोपटे होते, त्याचा वृक्ष होतो, तो तरुण होतो, त्याला हिरवी पाने येतात, तो जीर्ण होतो, त्याची पाने पिवळी होतात, तो नष्ट होतो. 'अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमति, अपक्षीयति, नश्यति' ह्या वेदान्तसूत्रात मानवी जीवनाचा हाच क्रम सांगितला आहे व तेच वेदान्तसूत्र चरित्रात वापरून जन्मापासून मृत्यूपर्यंत माणसाच्या जीवनाचा चढता व उतरता आलेख रेखला पाहिजे. आपल्या आत्मचरित्राला माटे यांनी 'चित्रपट' असे मोठे अन्वर्थक नाव दिले आहे. चरित्र हा चित्रपटच असला पाहिजे व त्यात प्राधान्य विवेचनापेक्षा व्यक्तिदर्शनाला असले पाहिजे. माणूस बोलतो कसा, दिसतो कसा, वागतो कसा, चालतो कसा हे हुबेहूब डोळ्यांपुढे उभे राहिले तरच व्यक्तिदर्शन साधले म्हणायचे. कारण तात्त्विक विवेचनात व बौद्धिक कसरतीत माणसांना रस नसतो. माणसाने माणूस पाहावा या न्यायाने माणसांना रस माणसांत असतो. 'शिवराजाचे आठवावे रूप। शिवराजाचा आठवावा प्रताप। शिवराजाचा आठवावा साक्षेप। भूमंडळी॥ शिवराजाचे कैसे बोलणे। शिवराजाचे कैसे चालणे। शिवराजाचे सलगी देणे। कैसे असे॥' अशा शब्दांत त्या काळात शिववर्णन करणाऱ्या रामदासांना अर्वाचीन चरित्रकलेची ही दृष्टी उत्तम होती. आज जर रामदास असते तर शिवचरित्राची समस्या चुटकीसरशी सुटली असती. व्यक्तिदर्शन हे या चरित्राचे प्रधान सूत्र आहे हे ध्यानात घेऊन हे चरित्र वाचले जावे. 'चरित्रकला म्हणजे मेलेल्या माणसांना जिवंत करण्याची कला आहे.' या जॉनसनच्या विधानाशी मी शंभर टक्के सहमत आहे.

### सरदेसाई चरित्र : शोध आणि बोध

चरित्र ही कला आहे, त्यामुळे 'इसापनीती' किंवा 'पंचतंत्रा' प्रमाणे तात्पर्य सांगून बोध करणे हे तिचे कार्य नाही. कलेचे कार्य सौंदर्यशोध आणि आनंदबोध हेच आहे. चरित्राचेही कार्य तेच आहे; पण बोध करणे हा चरित्राचा उद्देश नसला तरी चरित्र लिहिले म्हणजे त्यापासून बोध होतोच. जगाला प्रकाश द्यावा म्हणून सूर्य उगवत नाही; पण सूर्य उगवला म्हणजे जगाला प्रकाश मिळतो. माणसांना पाणी मिळावे म्हणून नद्या वाहात नाहीत; पण नद्या वाहिल्या म्हणजे माणसांना पाणी मिळते. त्याप्रमाणे बोध करावा म्हणून चरित्र लिहिले जात नाही,

पण चरित्र लिहिले म्हणजे त्यापासून आपोआप बोध निष्पन्न होतो. सरदेसायांचे चरित्र या दृष्टीने अत्यंत बोधप्रद आहे.

या संसारात माणसावर अनेक प्रकारच्या अप्रिय गोष्टींना तोंड देण्याची वेळ येते. आधी नोकरी लवकर मिळत नाही, मिळाली तर टिकात नाही, टिकली तर वरिष्ठ कामावर सदा असंतुष्ट असतो, पैसा पुरत नाही, समव्यावसायिकांच्या मत्सराची बाधा होते, निष्कारण वैरी भेटतात, आजार व दुखणी येतात, हातातोंडाशी आलेली मुले जातात, संसारातली सहचारिणी साथ सोडून जाते व माणूस लहान मुलासारखा अनाथ व पोरका होतो. दीर्घायुष्य शाप वाटू लागते. कारण आपणापेक्षा लहान माणसे आधी गेलेली पाहावी लागतात; आणि वार्धक्यामुळे शंकराचार्यांनी वर्णन केल्याप्रमाणे 'अङ्गं गलितं पलितं मुण्डम्। दशनविहीनं जातं तुण्डम्' अशी अवस्था होते.

या साऱ्या अवस्थांतून व अनुभवांतून सरदेसाई गेले होते आणि त्या आपत्तींतून ते टिकून राहिले होते. जितके प्रेम जास्त तितके दुःख जास्त व जितकी आसक्ती अधिक तितक्या यातना तीव्र. सरदेसायांनी विचाराने व अभ्यासाने आपले मनोबल वाढवले व आसक्तीवर ताबा मिळवला. या अनासक्तीमुळेच एवढे आघात सोसूनही त्यांचे मन पोलादासारखे ताठ व तेजस्वी राहिले; म्हणून ते इतकी वर्षे जगू शकले आणि एवढे डोंगराएवढे काम करू शकले. हा 'मनोबलविकास' हाच सरदेसायांच्या चरित्रापासून घेण्यासारखा अत्यंत मोठा बोध आहे. या दृष्टीने सरदेसायांचे चरित्र इतिहासकार नसलेल्या सामान्य संसारीजनांनाही चिरंतन मार्गदर्शक होण्यासारखे आहे यात शंका नाही

**ऋणमुक्तीचे समाधान**

मराठी इतिहासाच्या सर्वच अभ्यासकांवर सरदेसायांचे डोंगराएवढे ऋण आहे. वाल्मिकी झाला नसता तर रामाचे पराक्रम ज्याप्रमाणे भूतकाळात जमा झाले असते, त्याप्रमाणे सरदेसाई झाले नसते तर मराठ्यांचा इतिहास भर्तृहरीने म्हटल्याप्रमाणे कालवश होऊन स्मृतिपथात गेला असता. 'सर्वं यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः।' माझ्यावर तर सरदेसायांचे ऋण इतरांपेक्षा अधिक आहे. पन्नास वर्षांपूर्वी सरदेसायांच्या 'मराठ्यांच्या राज्यकथा' या पुस्तकातले संताजी घोरपड्याच्या शिरच्छेदाचे चित्र मी पाहिले ते आजही माझ्या डोळ्यांपुढे जसेच्या तसे उभे राहते. तेव्हापासून आजपर्यंत त्यांच्या 'रियासती' वरच मी वाढत आलो आहे. ग्रीक कवी होमर याच्या 'इलियड' या महाकाव्याचा इंग्रजी अनुवाद कीट्स् कवीने वाचला तेव्हा त्या अपूर्ववस्तुदर्शनाने त्याला जो विस्मय वाटला

व आनंद झाला तो वर्णन करताना त्याने म्हटले आहे की, 'त्यावेळी आकाश निरीक्षण करणाऱ्या खगोलशास्त्रज्ञाला त्याच्या दृष्टिपथात नवा ग्रह यावा तसे मला वाटले. 'Then I felt like a watcher of skies when a new planet swims into his ken.' सरदेसायांच्या रियासती मी वाचल्या, तेव्हा माझ्याही भावना कीट्सपेक्षा वेगळ्या नव्हत्या. आपल्या संस्कृतीत जन्माला येताना माणूस पितृऋण, मातृऋण व आचार्यऋण अशी तीन ऋणे घेऊन जन्माला येतो अशी कल्पना आहे. सरदेसायांचे ऋण हे या तीन ऋणांपैकी 'आचार्यऋण' म्हणावे लागले. या थोर इतिहासमहर्षीचे हे ऋण फेडताना आज मला ऋणमुक्तीचा निरतिशय आनंद होत आहे. 'प्राप्तानृण्या याति बुद्धिः प्रसादम्।' ऋण फेडले म्हणजे मन प्रसन्न होते, असे भासकवीने म्हटले आहे ते खरे आहे.


**आभार**

सरतेशेवटी आभार. या ग्रंथाला अनुदान देऊन त्याचे प्रकाशन सुकर केल्याबद्दल साहित्य संस्कृती मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. या ग्रंथाला सर्व महत्त्वाचे साहित्य श्री. स. मा. गर्गे यांनी पुरविले. तळेगावच्या जनरल हॉस्पिटलचे डॉ. अरविंद सरदेसाई हे सरदेसायांचे पुतणे, सरदेसायांच्या सहवासात ते पुष्कळ वर्षे होते. त्यांनी सरदेसायांच्या गृहजीवनातील बहुमोल माहिती तत्परतेने पुरवली व या ग्रंथाचे हस्तलिखित वाचून पाहिले. श्री. गर्गे यांनीही चरित्राचे हस्तलिखित आमूलाग्र बारकाईने तपासले. प्रा. म. अ. कुलकर्णी यांनी मंडळाच्या आदेशानुसार ह्या ग्रंथाच्या हस्तलिखिताचे परखड समीक्षण केले व बहुमोल सूचना केल्या. ह्या सूचनांचे साक्षेपाने पालन केल्याचे या ग्रंथावरून दिसेलच. सौ. शशिकला उपाध्ये यांनी त्यांच्या नेहमीच्या साक्षेपाने हा ग्रंथ नेटक्या व देखण्या स्वरूपात प्रकाशित केला.

या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.



**– श. श्री. पुराणिक**

३६ / न्यू आनंदनगर,<br>
तळेगाव - दाभाडे,<br>
पुणे - ४१० ५०६.